REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# मार्क्सवादाची टिपणे
# (सामाजिक व राजकिय विश्लेषणात्मक अभ्यास)

प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे
राज्यशास्त्र विभागप्रमुख ,
गंगामाई एज्यु. ट्रस्टचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगांव. ता. जि. धुळे.

## • प्रस्तावना –

औदयोगिक क्रांती झाल्यानंतर अस्तित्वात आलेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेतून जे कामगार आणि मालक यांचे संघर्ष निर्माण झाले अशा व्यवस्थेच्या विरोधात प्रथम वैचारिक क्रांती घडवून आणण्यात मार्क्सचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्याच्या विचारसरणीमुळेच श्रमिक संघ एकत्रित झाला, शक्तीशाली बनला व जागृत झाला. मार्क्सपूर्वीच्या राजकिय विचारवंतानी आर्थिक कारणांची उपेक्षा केली. परंतु मार्क्सने अर्थिक कारणातून निर्माण झालेल्या सामाजिक, राजकिय व अर्थिक परिणामांचा चिकित्सक अभ्यास करून मजुरांच्या हितांच्या मार्गातील अडथळे दूर केले. तरी शेवटी प्रश्न पडतो कि , अनेक राष्ट्रांनी साम्यवादी शासनप्रणाली का स्विकारली ? मार्क्सवादी विचार मजुरांशी प्रेम आणि भांडवलदारांवर आग ओकणारे का होते ? मानवी संबंधाच्या आजपर्यंतच्या इतिहासात अर्थिक घटकाने कोणती महत्वपूर्ण भूमिका बजावली ? मार्क्सप्रणित राजसंस्थेच्या विरोधात्मक विचारांचे पैलू काय आहेत ? कामगार प्रणित क्रांतीचे व सत्तेची उद्दिष्ट काय आहेत ? भौतिकवाद व चैतन्यवाद यातील संबंध मार्क्सने कसा दाखविला ? राजकिय अर्थशास्त्रात मार्क्सवादाचे महत्व काय असा अनेक प्रश्नांचा शोध घेण्यासाठी मार्क्सच्या संशोधनात्मक अभ्याासाची आवश्यकता भासते.

## • सारांश –

संपूर्ण शोधनिबंधाच्या अध्ययातून असा सारांश निघतो कि मार्क्सवादी विचार हे सामाजिक, अर्थिक व राजकिय प्रबोधन काही विचार आहे. समता , न्याय आणि स्वातंत्र्य यांचे समर्थन करून कामगार जागृती आणि राजकिय निती, मुल्ये, तत्वे यांच्यात बदल घडवून आणण्यात मार्क्सवादी विचार यशस्वी ठरल्याचे दिसून येते.

## • उद्देश –

प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश हा मार्क्सवादावर बुध्दिवतांनी जी विविध मते मांडली आहेत त्याचा विश्लेषणात्मक व चिकित्सक अभ्यास करणे व मार्क्सच्या मुलभूत विचाराला समाजासमोर मांडणे हा आहे.




## • मुख्य शब्द –

श्रमिक , नवचैतन्य, भौतिकवाद, भांडवलशाही , समाजवाद , औदयोगिकरण ,पिळवणूक , विघटन , उत्पादन , शोषण , श्रामिक क्रांती , वर्गविरहित समाज , इतिहास , बहुराष्ट्र कंपन्या , तंत्रज्ञान, खाजगीकरण, व्दंदवाद सिध्दांत, वर्गविरोध.

- **महत्व –**

मार्क्सच्या काही विचारावर टिका होत असली तरी त्याच्या विचाराचे महत्व मान्य करावे लागते."[1] कारण मार्क्सचे संपूर्ण विचार लोकांचे मत प्रभावित करणारे असल्यामुळे तसेच लोकांना आकर्षित करणारे गुण त्यांच्या सैध्दांतिक विवेचनात असल्यामुळे पुढील कारणांनी त्यांचे महत्व वाढते.
1 मार्क्सच्या सिध्दांताने श्रमिकांनाच सहानुभूती दाखवली.
2 धर्माला सिध्दांतामध्ये स्थान न देता उलट धर्माच्या नावावर गरिबांची होणारी पिळवणूक त्याने थांबवली.
3 मार्क्सने वास्तवतेला महत्व दिले ढोबळ विचार मांडता त्याला अनुभवाची जोड दिली.
4 श्रमिकांमध्ये त्याने नवचैतन्य व जागृती निर्माण केली.
5 भांडवलदाराची कान उघाडणी करण्यात मार्क्सच्या विचाराने महत्वपूर्ण भूमिका बजावली.
6 मार्क्सच्या विचाराने राजनितिज्ञही प्रभावित झाले. अर्थिक धोरण निश्चित करतांना मार्क्सच्या सिध्दांताकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे त्यांना कळून चुकले.

- **संशोधन पध्दती –**

प्रस्तुत शोध निबंधासाठी सामाजिक शास्त्रे संशोधनातील विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. व त्यासाठी विविध ग्रथांचा वर्तमानपत्रांचा वापर करण्यात आला.

- **गृहितके –**

1) मार्क्सवादाचा पाडावा झाला असला तरी मार्क्सवादाने श्रमिकांमध्ये मुलभूत अधिकार व हक्काची जाणीव निर्माण केली.
2) भांडवलशाही विरोधात कामगारांमध्ये क्रांतीची भावना निर्माण करण्यात मार्क्सवादी विचार यशस्वी झाला आहे.
3) मार्क्सवादामध्ये सामाजिक व राजकिय प्रबोधन करण्याचे सामर्थ्य होते.

वरील सर्व कारणांमुळे मार्क्सच्या विचाराचे महत्व खूप वाढले याच्या विघटनानंतर व मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रचार व प्रसारामुळे मार्क्सवाद कालबाहय झाला अशी ओरड टिकाकारांनी केली. परंतु आजच्या धक्काधकिच्या जीवनात व अर्थिक अस्थिरतेत मार्क्सवादाची प्रस्तुत निकडीची आहे. हे खालील विचारांवरून समजते प्रसिध्द विचारवंतांना भा.ल.गोळे म्हणतात मार्क्सवादाच्या आधारे लेनिनच्या नेतृत्वाखाली पहिली कामगार क्रांती सोविएत देशात शतकारंभी घडून आली होती. पुर्व युरोपीय देशातच नव्हे तर इंग्लंड अमेरिकेतही पुढे कामगार वर्गांचा राजकिय दबदबा वाढीस लागला होता. विशेषःत दुस–या महायुध्दानंतरच्या काळात क्रांतीच्या मार्गाने कामगार वर्ग देशोदेशीच्या भांडवलदारांची उत्पादन साधनांवरील मालकी हक्क नष्ट करील असा आशावाद जगात झपाटयाने पसरला होता. कामगारांच्या संघटित चळवळीला यश मिळवून त्यातून भांडवलदारांपासून कामगारांना संरक्षण मिळणे , त्यांची अर्थिक परिस्थिती सुधारणे आणि हितसंवर्धन साधने अशा गोष्टी साध्य झाल्या होत्या. विशेषःत संघटनेचा हक्क, कामाचे मर्यादित तास , आरोग्यपूर्ण व सुरक्षित कार्यस्थिती , रास्त मजुरी, महागाई भत्ता , रजा , आजार व अपंगत्वाच्या प्रसंगी अर्थसाहय अशा अनेक बाबीतील कामगारांच्या न्याय मागण्या त्या चहवळीमुळे पुर्ण होउ शकल्या होत्या. किमान वेतन , समानवेतन , कामाची हमी , कल्याणकारी सोयी व सुविधा प्रशिक्षण इ.साठी आवश्यक असलेले कामगार कायदे संख्येने सतत वाढत आले होते. धोरण प्रशासनाच्या आणखी अंमलबजावणीत कामगार हित हा एक महत्वाचा मानबिंदू होउन बसला होता. त्यामुळे समाजाचा एक प्रतिष्ठित व प्रभावशाली वर्ग , अर्थव्यवस्थेचा एक निर्णायक घटक आणि राजकारणातील एक जागृत व महत्वाची शक्ती असा मान आणि असे स्थान कामगार वर्गाला विसाव्या शतकातील घडामोडींनी मिळवून दिले होते."[2]

प्रा. रा. ग. जाधव म्हणतात "समाजवादी क्रांती आणि अणुशक्तीवर आधारलेली वैज्ञानिक तंत्रज्ञान यांच्या योगाने जगातील सगळया मागासलेल्या आणि विकसित झालेल्या जनतेला समृध्दीचे आणि सर्वांगीण विकासाचे सामजिक जीवन साध्य करता येईल, असा जबरदस्त आशावाद निर्माण झाला. मार्क्सवादाने या आशावादात अर्थशास्त्रीय दृष्टीकोनाचे महत्व स्थपित केले. त्यामुळे तो आशावाद बळकट झाला."[3]

र.वि. रानडे म्हणतात "आधिकृत शासनमान्य असलेला मार्क्सवाद साम्यवाद पराभूत झाला. पण अधिकृत साम्यवादाच्या / मार्क्सवादाच्या बरोबरीनेच जगात भांडवलशाही म्हणवल्या जाणा—या जगात साम्यवादाच्य / मार्क्सवाद जिवंत आहे व राहीले कारण ज्या ऐतिहासिक विकासाच्या प्रक्रीयेतील वास्तवातून मार्क्सवादाचा / साम्यवादाचा उदय झाला ती प्रक्रीया पूर्ण व्हायची आहे. 19 व्या शतकात विकास पावलेली भांडवलशाही रचनात्मक पातळीवर गुणात्मक दृष्टीने बदललेली दिसते आहे. भांडवलाची निर्मिती आणि गुंतवणूक 19 व्या शतकातील खाजगी मालकिच्या हक्काच्या स्वरूपात न राहता रचनात्मक दृष्टीने संधीभूत (कार्पोरेट) बनत आहे. मुनाफयांच्या आधारावर वस्तूंच्या न्युनतेवर न राहता बाजारपेठेच्या विस्तारीकरणावर आधारित करावयाचे हया प्रक्रीयेला मान्यता मिळाली आहे. मार्क्सला अर्थव्यवस्थेचे सामाजिकरण म्हणजे राज्याच्या मालकिची अर्थव्यवस्था म्हणून अभिप्रेत नव्हती. कारण मार्क्स मूलतः राज्यविरोधी होता. राज्याच्या आधार सत्ता आहे तर समाजाचा आधार ऐच्छिक सामाजिकतेमधील मानवी सृजनशीलता अमर्यादित असते 19 व्या शतकातील खाजगीकरण मालकी हक्काच्या संदर्भात व्यक्तिगत पातळीवर होते. आजच्या खाजगीकरणाला सामाजिकतेचा आकार येत चालला आहे 20 व्या शतकातील औदयोगिकरणाच्या उत्पादन क्षमतेला 19 व्या शतकातील व्यक्तिगत भांडवलशाहीच्या नकारात्मकतेने विकृत करण्याची प्रक्रीया सुरू असली तरी ती क्षीण होत चालली आहे. संपुर्ण अर्थव्यवस्थेचे सामाजिकरण करून राज्याच्या एकाधिकार संपुष्टात आणण्याची कल्पना मार्क्सला समाजवादाच्या संदर्भात आभिप्रत होती. सोव्हिएट युनियनमध्ये राज्याच्या अधीन असलेल्या भांडवलशाहीला समाजवाद म्हटले गेले. हे पुर्णःत मार्क्सवादाला विरोधी होते. तथाकथित समाजवादाच्या विरोधात नव्या व ख—या समाजवादाचा उदय भांडवलशाहीच्या गर्भाशयातून होणार ही मार्क्सची भूमिका खरी ठरत आहे हे नाकारता येत नाही. हया अर्थाने अधिकृत समाजवाद पराभूत होवून नव्या व ख—या समाजवादाचा उदय भांडवलशाहीच्या गर्भाशयातून होणार ही मार्क्सची भूमिका खरी ठरत आहे हे नाकारता येत नाही. हया अर्थाने अधिकृत समाजवाद पराभूत होवून नव्या व ख—या समाजवादाच्या निर्मितीमधील ऐतिहासिकता सिध्द होत चालली आहे. हया अर्थाने मार्क्सवाद — साम्यवाद समाप्त झाला असून तो समाजवादाला प्रत्यक्षात आणणा—या विचारसरणीचा आधार असलेली शास्त्रीयता आहे हे शक्य झाले कारण अधिकृत मार्क्सवादाच्या बरोबरीने स्वतंत्र समाजात मार्क्सवादाचा वाढता स्वीकार विकसित होत गेला हे सांप्रतचे ऐतिहासिक सत्य आहे."[4]

मार्क्सवादाची आवश्यकता येणा—या शतकात निकडीचे महत्व स्पष्ट करतांना वि. दा. करंदीकर म्हणतात "सोव्हिएट रशियाचे विघटन किंवा तेथील कम्युनिस्ट पार्टीची घसरण म्हणजे मार्क्सवादाचा पराभव नव्हे. मार्क्सच्या मूळ हेतूपासून फारकत घेणा—या धोरणांचा व सत्तेचा तो पराभव आहे. पिळवणुकिविरूध्दच्या संघटित व प्रभावी लढयाचा सर्वश्रेष्ठ अर्वाचीन प्रवर्तक म्हणून मी मार्क्सला मानतो. धनदांडग्या राष्ट्रांची अर्थिक साम्राज्ये त्यांच्या बहुराष्ट्रीय कंपन्याकडून अप्रगत राष्ट्रातील जनतेची शिष्टसंमत लुटमार करीत राहतात राष्ट्रांतर्गत अर्थिक नियोजनाचे दृश्य परिणाम झोपडपटटीतील अर्धनग्न पोरांपर्यंत पोहचलेला मला दिसत नाही तोपर्यंत माझा मार्क्सवाद इतिहास जमा होणार नाही."[5]

मार्क्सवाद महत्व आवश्यकता पटवून देतांना प्रसिध्द मार्क्सवादी अमेरिक विचारवंत श्री. पील. ए. बॅरन म्हणतात — " As long as capitalism last , as long as men live under an irrational social order Marxism can neither be discarded nor refuted- For Marxism is nothing if not a powerful magnifying glass under which the irrationality of the chapattis system – System protrudes in all its monstrous forms. Marxism will have outlive a itself only when it has reached the end of its historical journey ; when the conformation of reality with reason has become redundant because reality will be governed by reason. Until then it remains the task of Marxism through to carry on this confrontation under the concreat historical conditions of our time."[6]

भारतीय कमुनिस्त पक्ष आवश्यकता महत्व मान्य करतांना म्हणतो "मार्क्सवाद लेनिनवादाची वैज्ञानिक शिकवण आज सुध्दा लागू आहे, असे आम्ही मानतो. कालांतराने भांडवलशाही हटवून त्या जागी समाजवाद आणावाच लागेल, असे आम्ही मानतो. ( अशा समाजवादात लोकशाहीची न मानण्याची हमी दिली असेल) समाज परिवर्तनासाठी वर्ग संघर्ष करावा लागणारच असे आम्ही मानतो. त्याचप्रमाणे हे आवश्यक परिवर्तन घडवून आणण्यासाठी पक्षाच्या रूपाने बिनीच्या दलाची गरज आहे, असेही आम्ही मानतो."[7]

डॉ. आंबेडकरांनी सुध्दा मार्क्सवादाचे महत्व स्पष्ट करतांना म्हटले आहे कि माझे पहिले गुरू आणि श्रेष्ठ गुरू बुध्द होते. जगाचे कल्याण फक्त बुध्द धर्मच करू शकेल.

माझे दुसरे गुरू कबीर होते. कबीराला बुध्दाच्या तत्वज्ञानाचे खरे रहस्य कळले होते.

माझे तिसरे गुरू म्हणजे ज्योतिबा फुले होते. ब्राम्हणेतरांचे खरे गुरू तेच होते. शिंपी, कुंभार, न्हावी , कोळी, महार, मांग चांभारांना माणुसकिचे धडे फुल्यांनीच दिले आणि शिकविले. कोणी कोठेही जावोत आम्ही मात्र ज्योतिबांच्याच मार्गानी जाउ. जोडीला कार्ल मार्क्स किंवा दुसरा कोणी घेवू पण ज्योतिबा मार्ग सोडणार नाही.

बुध्दाने आपल्या तत्वज्ञानी किंवा धम्माची उभारणी ईश्वर आत्मा किंवा अशाचा अनाकलनीय अतिमानवी बाबींवर केव्हाही केली नाही. त्याने मनुष्याच्या वास्तव जीवनाकडेच अंगुलीनिर्देशन करून आपले सारे तत्वज्ञान विषद केले आहे. मनुष्य यातना, दुखः यांनी पीडलेला असतो, ही मानवी जीवनाची वास्तवता आहे. केवळ मार्क्सने या गोष्टींचा उहापोह केला असा नव्हे, तर त्याच्या जन्माअगोदर दोन हजार वर्षापूर्वी बुध्दाने हया गोष्टी जाणल्या व त्यावर उपायसुध्दा सांगितले, हे एक विशेष आहे. गरिबीच्या संदर्भात बुध्दाच्या तत्वप्रणालीत व कार्ल मार्क्सच्या तत्वप्रणालीत कमालीचे साम्य आहे."[8]

"It considers the Science of Marxism – Leninism as indispensable for charting its path to consistent democracy and Socialism. It Strives to use the Marxist methodology as a tool of understanding and changing Indian Society repudiating dogmatic and fossilised thinking, it is guided by this science and india's revolutionary heritage to chart out its path which will be determined by the particular charecterstics and features fo our country its history , traditions , culture , social composition and level of development."[9]

कम्युनिस्ट जाहिरनाम्याचे जागतिक महत्व कारखानिस व जे. आर. कराडकर म्हणतात. "The communists are sharing power in the small Hindu state of Nepal in the Himalayan range the communists are in power of china, the population of which is more than that of any other country, The balled of the recent glorious history of cuba, Vietnam, North Korea is being sung in all countries and the ruling communists parties there are continuing the heritage , the communists are a major contigent I the ruling alliance that took over power after overthrowing the racial rule in South Africa the communists party of Israel is openly Fighting against the warmongering of their rules , communists party functioning underground has a strong base in the Islamic fundamentalist state of Iran. It is an accepted fact that the communists are a strong force in Italy which surrounds the Vatican city of pope- Many more examples can be given. The recent developments in the restwhile Soviet union and other socialist states are , despite everything, very encouraging. The basic point or basic thought accepted by all these parties and forces are rooted in the maniforto."[10]

वर्तमान काळातील मार्क्सवादाचे महत्व पटवून देतांना एजाज अहमद म्हणतात माझ्या अल्पबुध्दीनुसार सोव्हिएट युनियन आणि इतर कम्युनिस्ट पक्ष आणि कम्युनिस्ट सत्ता यांनी जो काही इतिहास निर्माण केला आहे त्यापेक्षा मार्क्सवाद खूप जुना आहे. मार्क्सवादाचा स्वतःचा स्वतंत्र असा इतिहास आहे. मार्क्सवादी सिध्दांताचा इतिहास व या सिध्दांताच्या आधारावर उभ्या असलेल्या राजसत्तेचा इतिहास या दोहोमध्ये गल्लत केली जावू नये. कम्युनिस्ट शासनाच्या विघटनानंतरदेखील मार्क्सवादाचा इतिहास हा गतिमान असा आहे. माझ्या दृष्टीने मार्क्सवादाचे अस्तित्व जगात जोपर्यंत भांडवली समाजरचना आहे तोपर्यंत राहील. कारण वर्गीय समाजरचना पुर्णपणे समजून घेउन ती बदलण्याचे मार्क्सवाद हे महत्वाचे शास्त्र आहे. त्यामुळे त्याचे महत्व किंवा गरज एखादया शासकिय व्यवस्थेच्या असण्यानसण्यावर अवलंबून नसते. उलट भूतकाळातील, आजच्या वर्तमानकाळातील आणि उदया येणा–या भविष्यकाळातील जगाला समजून घेण्यासाठी, बदलण्यासाठी मार्क्सवाद किती सहायभूत ठरेल , यावर त्याचे महत्व अवलंबून आहे."[11]

"If modern thought has coqe to be identified with western thought , it is only because , it is in the west that during the last two are three Centuries modern Social development has proceeded unhampered, while the Orient was kept enslaved in colonial bondage, and therefore left behind in its natural development. Marxism developed its philosophical Materialism on the foundation of

modern thought , which is not without the considerable contribution of Indian philosophy , culture and heritage. But as modern thought is now universal Marxism also has universal retrrnance and application."[12]

मार्क्सवादाचे विश्वविजयी सामर्थ्य सांगता एमिल बर्न्स म्हणतात "भांडवलदारवर्गाचे राज्य असलेल्या देशांवर आजही युध्दाचे ढग जमलेले आहेत. अर्थिक अडचणींनी ते गांजलेले आहेत. त्यांची सामाजिक प्रगती खुंटली आहे. भय व भवितव्याविषयी निराशा यांनी त्यांना ग्रासले आहे.

परंतु ज्या देशांत मार्क्सवादाप्रमाणे चालते, तेथे युध्दाला स्थान नाही, तेथे उद्योगधंदे व शेती उत्पादन द्रुत गतीने धावत आहे, सामाजिक प्रगतीचा तोच आधार आहे. सोव्हिएट युनियन समाजवादाकडून साम्यवादाकडे होणा—या परिवर्तनाच्या पहिल्या खुणा प्रचंड रचनात्मक योजनांच्या रूपाने दिसत आहे. सुखी व संपन्न भवितव्याच्या आशा व विश्वास तेथील जनतेला स्फूर्ती देत आहे. जनतेचे मार्गदर्शक तत्व म्हणून मार्क्सवादाचा स्वीकार केला म्हणजे मग मार्क्सवादाचे विश्वविजयी सामर्थ्य प्रत्ययांस येते. या विधानाची सत्यता वरील दोन जगांच्या चित्रांतील दरसाल वाढत जाणा—या विलक्षण विरोधातून प्रकट होत आहे."[13]

मार्क्सवादाच्या विचारातून रशियामध्ये प्रथम कामगार क्रांती झाली या क्रांतीमुळे कामगार वर्गीयांमध्ये जी जागृती झाली त्याचे महत्व स्पष्ट करतांना प्रभाकर सांझगिरी म्हणतात "रशियांच्या कामगार वर्गाने ऑक्टोबर क्रांती करून जागतिक भांडवलशाहीच्या तटबंदीला पहिले खिंडार पाडले आणि पहिल्या समाजवादी राज्याची , सोव्हिएत युनियनची , विजयाची स्थापना केली. तेव्हा ती जगातील सा—या कामगारवर्गाची कमाई होती. साम्राज्यवाद्यांच्या कारस्थानापासून त्या कमाईचे रक्षण करणे हे सर्व देशांतील कामगारवर्गाचे आंतरराष्ट्रीय कर्तव्य होते. भांडवलशाहीतील हे खिंडार बुजवण्यासाठी आणि जगातील पहिले समाजवादी राज्य नष्ट करण्यासाठी हिटलरने युरोपची सारी साधनसामुग्री घेउन हल्ला चढविला, तेव्हा समाजवादाच्या रक्षणासाठी सोव्हिएतने केलेले युध्द हे न्याय युध्द होते आणि फॅसिस्ट आक्रमकांचा पराभव करण्यासाठी त्या युध्दाला जगभराच्या कम्युनिस्टांनी पाठींबा दिला. यांत काही गैर नव्हते. सोव्हिएतच्या विजयाने आणि फॅसिझमच्या पराभवाने जागतिक साम्राज्याशाही खिळखिळी झाली आणि अशिया अफ्रिकेतील अनेक परतंत्र देशातील स्वातंत्र्य लढयाच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला हा इतिहास आहे."[14]

"आधुनिक भांडवलदारी मालकी पध्दतीचा अटळ व निकट विनाश जाहीर करणे हा कम्युनिस्ट जाहीरनाम्याचा उद्देश होता."[15]

"मार्क्सने वर्गसंघर्षाचा सिध्दांत प्रतिपादित केला आहे. भांडवलशाही व्यवस्थेत श्रमिकांचे शोषण करण्याचा क्रियेचा अतिरेक झाला कि श्रामिक वर्ग धनिक वर्गाविरूध्द क्रांतीचे निशान उभारतो. ही क्रांती म्हणजे वर्गसंघर्ष होय. यांत अंतिम विजय नेहमीच श्रमिकांचाच होतो. त्यानंतर राष्ट्रात काही काळ श्रमिकांची हुकुमशाही उदयाला येते. या काळात धनिक वर्गाचे खच्चीकरण करण्यात येउन सर्व सत्ता श्रामिकांच्या हातात केंद्रित होते. समाजातून धनिक वर्ग नाहीससा झाला कि वर्ग संघर्षाचे कारणच राहत नाही. वर्ग संघर्षाचे अंतिम उद्दिष्ट वर्गविरहीत समाज म्हणजे साम्यवाद निर्माण करणे होय "[16]

"समाजवादाची स्थापना करणे हे अंतिम उद्दिष्ट असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे समाजवादी अर्थव्यवस्थेतील उत्पादन हे जनतेच्या वाढत्या भौतिक व सांस्कृतिक गरजा भागवणे असते."[17]

मार्क्सच्या मते "राज्य ही वर्गसंघर्षाची उत्पत्ती आहे. उत्पादनाच्या भौतिक साधनांच्या मालकांनी आपल्या संरक्षणासाठी उभे केलेले ते एक बुजगावणे आहे.राज्याचे स्वरूप प्रामुख्याने वर्गविरोधावर आधारित असते अंतर्गत व बहिर्गत आक्रमणापासून भांडवलदारांच्या संपत्तीचे रक्षण करणे हाच राज्याचा उद्देश आहे. राज्य म्हणजे एका वर्गाने दुस—या वर्गाचे शोषण करण्याचे एक साधन आहे.त्यामुळे राज्याची सत्ता श्रमिकांनी आपल्या हाती घेतली पाहीजे व्दंदवादाच्या सिध्दांताच्या आधारे मार्क्स म्हणतो कि , भविष्यात राज्य राहणार नाही. वर्गविहीन व राज्यविहीन समाजाची स्थापना होईल हे अंतिम उदिष्ट आहे."[18]

"स्त्रियांच्या केवळ उत्पादनाचे साधन म्हणून असलेला दर्जा नाहीसा करणे हाच आमचा खरा उद्देश आहे. "[19]

- **विश्लेषण –**

मार्क्सचे काही विचार हे जगमान्य आहे तर काही जगमान्य नाही. तत्वाबाबत सकारात्मक नकारात्मक विचार असू शकतो. परंतु मार्क्सवादी विचार मार्क्सच्या पाडण्यानंतर संपुर्णपणे कालबाहय झाला असे कोणीही पुर्णपणे म्हणू शकत नाही. भारताचा विचार केला तर भारतात वर्ण व्यवस्था होती पण वर्गव्यवस्था नव्हती. मग शोषण हे दोघेही वर्गामध्ये सारखेच होते. भारतातील स्पृश्य–अस्पृश्यता, जातीयता यांतुन होणारे शोषण आणि कामगार वर्गाचे शोषण हया दोघांचा प्रचंड विरोध समाज सुधारकांकडून झालेला दिसून येतो. भारतात राजाराम रॉय पासून तर डॉ. आंबेडकरांपर्यंत या सर्वांनी शोषणाविरूध्द आवाज उठविला होता. आज कामगारांचे होणारे शोषण हे थांबविण्याच्या माध्यमातुन भारतातील मार्क्सवादी पक्ष, संघटना, गट यशस्वीदेखील झालेल्या आहेत. भारतात वर्णव्यवस्था जरी असली तरी कामगारात शोषणयुक्ती जनजागृती निर्माण करण्यात मार्क्सवादी विचार थोडेफार यशस्वी ठरले आहेत हे नाकारता येत नाही.

1991 नंतर रशियाचा पाडावा झाला आणि लोकशाहीचे वारे संपुर्ण जगात वाहू लागले. अनेक राष्ट्रांनी मार्क्सवादी विचारसरणी नाकारली. संपुर्ण जग हे खाजगीकरण, सहकारीकरण, सरकारीकरण यांच्याकडे वळू लागली. भांडवलदारांना नियंत्रित करून भांडवलदारांना सोबत घेवून विकास करण्याची रणनिती व कामगार कल्याण्याला सर्वोच्च स्थान देण्याची धोरणे शासनव्यवस्था आखू लागली. आज मोजक्याच देशात मार्क्सवादी व्यवस्था आस्तिवात जरी असली तरी कामगार हिताच्या बाबतीत अत्यंत समर्थक विकासवादी तेथील शासन निर्णय घेतांना दिसून येत आहेत.

आज आपण संपुर्णपणे भांडवलशाही व्यवस्था नाकारू शकत जरी नसलो तरी भांडवलदार मजुर शासन यांच्या योग्य समन्वयातून कामगार हिताचे योग्य निर्णय घेण्याची लोकशाही व्यवस्था आपण निर्माण करण्यात यशस्वी ठरलो आहे. आज जागतिक स्तरावर कामगारांमध्ये जी शोषण मुक्तीची जागृती निर्माण झाली त्याला मार्क्सवादी विचार कारणीभूत आहे हे देखील तेवढेच सत्य आहे. आज युरोप अशिया, आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्र कामगारांच्या हिताकडे लक्ष देत आहेत. कामगार कल्याण व कामगार सुरक्षा धोरणे सक्षमपणे राबविले जात आहे.

भारतात देखील कामगार जागृती निर्माण होवून शासन कल्याणकारी धोरणांच्या माध्यमातून कामगार हित साधण्याचा प्रयत्न जास्तीत जास्त करत आहे. आणि ही जागृती करण्यात मार्क्सवादी विचाराची भुमिका व विचार अत्यंत महत्वाची ठरले आहे. हे शेवटी मान्य करावे लागेलच.

- **निष्कर्ष –**

मार्क्सवादात संपुर्ण जगाला सामर्थ्यवान, शोषणमुक्त आणि आर्थिक व राजकिय व्यवस्थेचे विकेंद्रीकरण करून समाजभिमुख व्यवस्था निर्मित करण्याची ताकद होती. त्यामुळे संपुर्ण दोष मार्क्सवादाला देणे चुकीचे ठरेल. म्हणून आज विचार करण्याची आवश्यकता आहे कि, आमची व्यवस्था मार्क्सवादी विचार सक्षमपणे लागू करण्यात अपयशी ठरली का ? कारण मार्क्सची ध्येय आणि उदिष्ट उदात्त होती शोषणमुक्त समाज निर्माण झाला पाहिजे व व्यक्ती व्यक्तीमधील असमानता दूर झाली पाहिजे असा वैश्विक प्रबोधनकारी विचाराचा पाया रचून मानवमुक्तीचा संदेश देणारा मार्क्सवादी विचार जागतिक व्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ होता हे मार्क्सच्या विचाराचे संपुर्ण अध्ययन केल्यानंतर नाकारता येत नाही.

- **संदर्भसुचि –**

1. शृंगारपुरे अरविंद : पाश्चिमात्य राजकीय विचारक, आवृत्ती–3, श्री. मंगेश प्रकाशन , नागपूर, 1988 , पान नं. 237.

2 दै. लोकमत दि. 30/11/99 मध्ये कामगार वर्ग यापुढे क्रांतीचा अग्रदूत असेल या प्रकाशित लेखामधून.

3 कर्मयोगी विव्दान या शीर्षकाखाली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर सकाळ 23 जानेवारी 2000 रोजी प्रकाशित लेखामधून.

4 दै. लोकमत (साहीत्य जत्रा पुरवणी) दि. 19 जुलै 1998 मध्ये कम्युनिस्ट मॉनिफेस्टोच्या 150 वर्षाच्या निमित्ताने मध्ये प्रकाशित लेखामधून.

5 वि.दा करंदीकरांना महाराष्ट्र फाउंडेशन तर्फे गौरव पुरस्कार कोल्हापूर येथे देण्यात आला. त्यावेळी त्यांनी केलेल्या भाषणातून महाराष्ट्र टाइम्स. 28 / 12 / 1997.

6 Baran P.A. The longer view, Monthly Review Press, New York – P-41

7 भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या 16 व्या अधिवेशनातील राजकिय ठरावातील परिच्छेद ( दिल्ली 6 ते 12 ऑक्टोबर 1995)

8 सहस्त्रबुध्दे अ.म. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 101 मौलिक विचार , आवृत्ती – 6, लोकवाडमय गृह, मुंबई, 2000 पाने – 23–24.

9 Bardhan A.B. : Marxism – Leninism and our current problem Communist party of India Publication, 1994, New Delhi, Page No -4

10 Karkhanis L. S. Karhadkar J.R. : Manifesto of the communist party (1848) its Relevance Today, Lokvangmay Griha, Bombay, 1997, Page-1

11 एजाज अहमद – मार्क्सवादाचे आजच्या काळातील महत्व आवृत्ती – 1998 , लोकवाडमय गृह, मुंबई , (अनुवाद – डॉ. सूर्यनारायण रणसभे ) पान. नं. 12

12 Bardhan A.B. : Marxism – Leninism and our current problem Communist party of India Publication, 1994, New Delhi, Page No –II

13 एमिल बर्न्स : मार्क्सवाद म्हणजे काय ? आवृत्ती – 5 (1) , लोकवाडमय गृह , मुंबई (अनुवाद – सरला कारखानीस ) , 2000 , पान नं. 85

14 संझगिरी प्रभाकर : कम्युनिस्ट जाहीरनाम्याची दिडशे वर्ष , आवृत्ती – 1 , लोकवाडमयगृह , मुंबई, 1998 , पाने 14–15

15 मार्क्स एंगल्स : कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा, प्रगती प्रकाशन ( मराठी अनुवाद – डॉ. रविंद्र रसाळ) , 1989 , मास्को, पान नं. 29.

16 शृंगारपुरे अरविंद : पाश्चिमात्य राजकिय विचारक , आवृत्ती – 3 , श्री मंगेश प्रकाशन, नागपूर , 1988 , पान नं 228

17 प्राथमिक शिक्षणक्रम – टिपणे (1989), भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र राज्य कौन्सिल प्रकाशन, पान नं. 14

18 शृंगारपुरे अरविंद : पाश्चिमात्य राजकिय विचारक , आवृत्ती – 3 श्री मंगेश प्रकाशन , नागपूर , 1988 , पान 235

19 मार्क्स एंगल्स : कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा , प्रगती प्रकाशन , मराठी अनुवाद – डॉ रविंद्र रसाळ , 1989 , मास्को, पान नं. 29